VOL- VI ISSUE-VIII AUGUST 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# सिग्मंड फ्राईड यांच्या विचारसरणीचा कथा, कादंबरी वाङमय प्रकारावर प्रभाव

**डॉ.बालाजी व्ही. डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

डार्विनच्या संशोधनामुळे संबंध जगामध्ये खळबळ उडाली. त्या त्या धर्मशास्त्राने ज्या धर्मकल्पना मांडली होती. त्याचा परिणाम झाला. फ्राईडचा जन्म चेकोस्लोव्हाकियातील पर्झीबार येथे ज्यू वंश कुटूंबात झाला. ते मानसोपचारतज्ञ, मनोविश्लेषणशास्त्राचे जनक, संशोधनशास्त्राचे जनक होते. स्वप्नांचे विश्लेषण केले. मानसशास्त्र हे मानवी मनाचा अभ्यास करीत असते.माणूस जागृत असतो तेंव्हा त्याचे मन हे सतत सक्रिय असते. मनाच्या सुप्त अवस्थेत विचार करते. मनाचे प्रकटमन आणि अप्रकटमन असे दोन प्रकार सांगितले. स्वप्नात मानवी मनाचे चाळे चालतात. मानवी मन अमूर्त आहे. मनोव्यापार जे जे दिसते, ऐकायला येते, प्रत्येक बाबतीत मनाकडून व्यापार होतात. सुप्त मनाच्या वासना, मनोपातळीवरील संघर्ष चालतात.मनाचे हेतू असतात. सर्व हेतू चांगले किंवा वाईट असतात. या सर्व सुटया-सुटया गोष्टी नसतात. तर मनात त्याची गुंतागुंत होत असते. ते एकमेकात मिसळलेले असते. एकूणच मानवी वर्तनाची कारणे शोधून कांही सिध्दांत मांडले.

एखादा चोर चोरी का करतो? समोपदेश मानवी मनाला बोलतो. तेंव्हा माणूस जे काही आडाखे बांधतो, कांही वर्तणूक करतो. त्याला हे सर्व घटक कारणीभूत आहेत. याचा अभ्यास मानसोपचार तज्ञ करतात. फ्राईडने हा अभ्यास पहिल्यांदा केला.मानवी वर्तन हे सर्वसामान्य आणि कधी-कधी असाधारण होते. विक्षिप्तपणासुध्दा असाधारणपणातून येतो. विक्षिप्तपणा कांही माणसाच्या देहाकडून वर्तन घडते. मनोशास्त्र विश्लेषणाचे निर्माण केले.ज्या आजारांचे सकृत दर्शनी कांही कारण आढळत नाही अशा मनोरूग्णावर प्रयोग करून सुधारणा केली.सिग्मंड फ्राईडचे कांही सिध्दांत कालबाहय झाले असले तरी त्यांचे महत्व कांही कमी झाले नाही. संज्ञाप्रवाहाचा मराठी साहित्यावर या संकल्पनांचा प्रभाव पडला. माणूस दिवास्वप्न पाहत असतो. स्वप्नात मन खळाळत असते. लेखक तेंव्हा लिहित असतो. उदा. राम गणेश गडकरी एकच प्याला लिहितात तेंव्हा सुधाकर हे नाटकातील पात्र निर्माण करताना कुठलातरी एक वकील डोळयासमोर येतो. तसेच सिंधूचे पात्ररचना लिहिताना त्यांच्यासमोर चार-पाच सद्‌गुणी स्त्रिया असतात. स्वप्नाचा आणि सहित्यनिर्मितीचा घनिष्ठ संबंध असतो. उदा. बा.सी.मर्ढेकरांची तांबडी माती ही कादंबरी संज्ञाप्रवाह आहे. असंबंध्द लेखनातून वाचकाला कांही अर्थबोध होत नाही. मोकाट मन हे स्वैर असते. सर्जन चित्र, संगीत, मूर्ती प्रतिभाशक्ती याचा संबंध कलाव्यापारांशी आहे.

संमोहनशास्त्र संमोहनाचे प्रयोग वेडाचारावर होतात. प्रत्येक माणसात संमोहनशास्त्राचा उपचार वेडाचारावर केला जातो. मनोदैहिक रूग्णांवर उपचार करताना विविध आजार होतात. भिती, दडपण, काळजी, वैफल्य, नैराश्य यातून मनाचे आजार होतात. समतोल ढळतो. अशा आजारावर संमोहनशास्त्र उपचार करते मनोव्यावस्थेचा अभ्यास करते. संमोहनशास्त्राचा उपयोग साहित्यात कसा होता. तर कादंबरीतील विशिष्ट प्रकारचा गंभीर प्रश्न वाचत असताना वाचक रडतो. म्हणजे साहित्यकृती रसिकांना कब्जात घेते. रसिकाने तटस्थ राहूनच कलास्वाद घ्यावा लागतो. भावनांचा आणि विचारांचा जाणीवपूर्वक कोंडामारा केल्यास उन्माद घडत असतो. मानसिक चेतनेची कोंडी होऊन शारीरिक व्याधीत त्याचे रूपांतर होते. भावनेचा निचरा होण्याचा सिध्दांत आहे.

ओडिपसकॉम्पलेक्स मानसिकतेचा लैंगिकतेचा सिध्दांत या नावाने तीन निबंध प्रसिध्द केले. ते गाजले पण चांगल्या अर्थाने नाही. खळबळ उडवून दिले. आईबापाच्या विविध प्रकारच्या जबरदस्तीला आणि मानसिक आजार होतात. खरे तर हे आजार आईवडिलांच्या लैंगिक आजाराने निर्माण होतात हे आजही मान्य नाही. लहानपण मज्जातंतूमध्ये विकृती निर्माण होते. समाज निषेधामुळे, निर्बंधामुळे विकृती निर्माण होते. लैंगिक इचछा व अनुभवांना मोकळी वाट मिळत नाही. त्या इच्छा अबोध मनात दडपलेल्या असतात. तेथून त्या प्रतिकरूपात आपल्या बोधजीवनात पुन्हा अवतिर्ण होतात. त्यामुळे मज्जाविकृती निर्माण होते. प्रकटमन बोधमन,

अपक्रटमन अबोधमन आणि तेथे चालणा-या विचार, भावनांच्या हालचाली साहित्य निर्मितीशी संबंध असतो. बा. सी. मर्ढेकरांवर फ्राईडच्या या सिध्दांताचा प्रभाव पडला आहे. उदा. पिपात मेले ओल्या उंदिर अबोधमनातील अनुभव प्रकट मनात येतात आणि साहित्यकृतीतून व्यक्त होतात. फ्राईडचे अनुयायी अल्फ्रेड ॲडलर कार्ल युंग या दोन अनुयायांनी 1911 मध्ये हा फ्राईड संप्रदाय सोडला. जीवनातल्या प्रत्येक प्रेरणेकडे लैंगिक संकल्पनेतून पाहणे योग्य नाही. असे या दोन शास्त्रज्ञांचे मत होते. फ्राईडने धर्म, पुराणकथा, विनोद, साहित्य, कला, इतिहास, इत्यादींची मीमांसा मनोविश्लेषण सिध्दांताना अनुसरून केली. धर्माचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्टिकोणातूनकेला. प्राण्यासारखे माणसालाही जगावे वाटते पण तसे वागता येत नाही. तर सुसंस्कृतपणे वागणे धर्माची भिती धातली की मनावर भिती असते. पुराणकथा मारूती जन्मतःच उड्डाण करून सूर्याला गिळायला गेला, कुंभकर्ण सहा महिने झोपत होता, या पुराणकथा का निर्माण झाल्या? तर त्यालाही मानसशास्त्रीय आधार आहे. या कथांत चमत्कारकता, अद्‌भूतता असते.विनोद अश्लिल विनोद, आखूड विनोदातून माणसाचे मन लक्षात येते. मनोअवस्थेच्या साहयाने कल्पना करून साहित्यिक विस्तार करतो व त्याची परिभाषा मांडत असतो. कलासंप्रदाय 20 व्या शतकातील आधुनिक कलासंप्रदायात अस्तित्ववाद, फ्राईडच्या मनोविश्लेषण शास्त्राचा फार मोठा प्रभाव आहे. याला मनोविश्लेषणशास्त्र, मानसशास्त्र यांचा संबंध जोडला त्याबद्दल त्यांना 1930 मध्ये गटे पारितोषिक मिळाले हा सिध्दांत त्यांचा मौलिक आहे. स्वप्न आणि कलानिर्मिती यांचा ढोबळ मानाने खूप संबंध असतो. साहित्यनिर्मितीतून व्यक्त होणारे अनुभव मुक्तपणे व्यक्त होतो. कलावंताना कामुकतेचे विविध रूपे, पुर्वविचार जाणवत आले की, कलावस्तूचा नविन अर्थ लावताना फ्राईडने नवी व्यवस्था लावून दिली. सृजनशक्ती, नवनिर्मिती ही पवित्र आहे. उदा. रस्किन यांची यामा फ्राईड विचारसरणी विरूध्द खुप वाद झाले. तरी परंतु त्यांचा प्रभाव आजही मान्य केला जातो. संज्ञा, सिध्दांताचा आधार मराठी साहित्यिक आजही घेताना दिसतात. ॲना फ्राईड ही त्यांची कन्या मनोविश्लेषण तज्ञ म्हणून किर्ती मिळवली. अशा प्रकारे मराठी वाङमयावर फ्राईड य पाश्चात्य विचारवंताच्या विचारसरणीचा प्रभाव केंव्हापासून पडला आणि त्यांची ही विचारसरणी मराठी वाङमयाच्या प्रकारांवर प्रभावित झाली त्याचा विचार खालीलप्रमाणे करणार आहोत.

मराठी साहित्यामध्ये फ्राईड प्रथम नवसाहित्यात आला. नवकथा, नवनाटय, नवकविता, नवटिकावाङमय प्रकारांवर फ्राईडच्या मनोविश्लेषणशास्त्र, संज्ञाप्रवाह, दिवास्वप्न इत्यादीचा प्रभाव पडलेला आहे. वस्तुतः वाङमय व मानसशास्त्र यांचा संबंध पूर्वकालापासून चालत आलेला आहे. परंतु मानसशास्त्रज्ञांनी तत्वचर्चाप्रधान व मूल्यवादी शास्त्रांपासून वेगळे करून त्याला प्राप्त करून देण्याचे मुख्य श्रेय प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्राईड यांच्याकडेच जाते. त्यांनी मानवी मनाची वेगळी प्रतिमा निर्माण केली. मनुष्याची ध्येय, विविध संघर्ष, धडपडी, उपक्रम, तथाकथित भावना, इत्यादी आणि तत्संबंधी बाबींना संकल्पनांना अगदी वेगळा असा आशय आणि संदर्भ फ्राईडने प्राप्त करून दिला. कथा, कादंबरी, चरित्र इत्यादी आदिबंधात मानसशास्त्राचा व्यापक परिणाम दिसून येतो. हा परिणाम अंतर्गत व बाहय अशा दोन प्रकारचा आहे.

कथावाङमय अंतर्मनाचे उदाहरण म्हणजे स्वभाव दर्शन पूर्वकालीन कथावाङमयात जशा ठसठशीत भव्य, परिणामकारी, व्यक्तीरेखा भेटतात. तशा आजच्या वाङमयात फारशा आढळत नाही. नव्या मनोविज्ञानाप्रमाणे मुख्य प्रश्न पात्रांच्या अंर्तमनात डोकावण्याचा असतो. जाणीवयुक्त मनाचा शोध अनेकांनी घेतला आहे. त्यातून पाश्चात्य राष्ट्रात संज्ञाप्रवाही कादंब-या निर्माण झाल्या. मर्ढेकर व गाडगीळ यांच्या नवनिर्मितीला पाश्चात्य साहित्य संस्कृतीचे संस्कार प्रेरक ठरले.गंगाधर गाडगीळ हे किडलेली माणसे या कथेमध्ये मानवी मनाचा शोध घेतात. त्याचबरोबर मंजुळा या कथेमध्ये महानगरीय संस्कृतीत नौकरी करणा-या मध्यमवर्गीय स्त्रीच्या मनाचा कोंडमारा, तिच्या मनाची घुसमट व्यक्त करताना मंजुळा या पात्राच्या अंर्तमनात शिरतात आणि तिची मानसिकता चितारतात. अरविंद गोखले तसेच व्यंकटेश माडगुळकर माणदेशी माणसं या कथासंग्रहातील झेल्या या कथेमध्ये एका लोहाराच्या झेल्या नावाच्या विद्यार्थ्यांशी एक शिक्षक या नात्याने त्याच्या एकूण परिस्थितीचा मनाचा शोध घेतात झेल्याच्या अंतःकरणात शिरून माडगूळकर साक्षात झेल्या उभा करतात. त्यांच्या सृजनशीलतेने अनेक ठिकाणाहून अनेक गोष्टी ग्रहण केल्या स्वतः माडगूळकर मनाविषयी म्हणतात, मनाचा कल अशा सुक्ष्म गोष्टी टिपण्याकडे असला की शहाणे मन रस्त्याने जात असताना दुसरे एक वेडे मन कोठेही भटकत असते.दिसेल ते, आवडेल ते गोळा करीत असते.या कलावंताने आपल्या वेडया मनाने गोळा केलेल्या

अशा गोष्टींना आपल्या प्रतिभेने एक स्वतंत्र, स्वत्वसंपन्न असे अस्तित्व आणि रूप लाभवून दिले. माणदेशच्या भूमीत ज्यांची पाळेमुळे खोलवर रूजली होती. त्या माडगूळकरांना साहित्याच्या क्षेत्रात जे सहज उर्मीने करावेसे वाटत होते. त्याच्याशी संवादी सूर त्यांना कित्येकदा पाश्चात्य वाङमयातून गवसले. माडगूळकरांचे आकलन देशी आणि पाश्चात्य अशा परस्परभिन्न संस्कारातून, प्रभावातून घडले. त्याच पध्दतीने फ्राईड यांनी मनाचे दोन प्रकार सांगितले प्रकटमन-बोधमन, अप्रकटमन अबोधमन म्हणजे मनोविश्लेषणाचा प्रभाव माडगुळकर, गाडगीळ यांच्या पात्रावर पडलेला आहे. म्हणजेच गंगाधर गाडगीळ, अरविंद वामन गोखले, पु.भा. भावे, माडगुळकर यांच्या कथातील पात्रावर मनोविश्लेषणशास्त्राचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

या नव्या मनोविज्ञानामुळे कथानक, भाषा, घाट अशा सर्वच कांही बाबी प्रभावित झाल्या. कथाकारासंबंधीचे रूढ संकेत या नव्या जाणिवेमुळे अपूरे ठरू लागले. व्यक्त केलेले असते त्याहून किती तरी अधिक गोष्टी कलाकृती सुचविते. त्यामुळे साहित्यकृतीच्या घाटाचा नव्याने विचार होऊ लागला. अबोधमनाचा शोध घेण्याच्या प्रक्रियेमुळे रूढ व्यक्तिचित्रणाचे रूप बदलते. एखादा माणूस सज्जन असतो.दुसरा पुर्णतः दुष्ट असतो ही जूनी कल्पना अबोध मनाच्या शोधामुळे अपुरी ठरते. माणूस हा माणूस असतो. त्याच्या अबोधमनात दडपलेल्या गोष्टीची साक्ष काढली तर या संदर्भात सरधोपटपणे बोलणे कसे कठीण आहे. याचा प्रत्यय येतो. नेणिवेतील दडपलेल्या गोष्टी विस्कळीत असतात. त्यात असंबंध्दता असते आणि या गोष्टी मुख्यत्वे वासनांशी निगडीत असतात. या अबोधसंज्ञाप्रवाहाचे चित्रण होऊ लागले. पाश्चात्य साहित्यात जेम्स जॉईन, व्हर्जिनिया वुल्फ, विल्यम फॉकनेर इत्यादी लेखकांनी संज्ञाप्रवाही चित्रणाचे प्रयोग यशस्वीपणे केले. मराठीत हा उपक्रम फारसा यशस्वी झाला नाही. कारण मराठी वाचकांपर्यत मानसशास्त्राची ही नवी संकल्पना पोहचली नाही.मराठीत प्रा. वसंत कोल्हटकरांच्या घर या कादंबरीतून विश्राम बेडेकरांच्या रणांगण मधून आणि मर्ढेकरांच्या रात्रीचा दिवस तांबडी माती आणि पाणी या कादंब-यातून संज्ञाप्रवाही चित्रणाचे प्रयोग केले गेले.विसाव्या शतकाच्या पहिल्या पाव शतकात टिळाकंचा राष्ट्रवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, रानडे आगरकरांचा सुधारणावाद या विचारप्रणालीच्या सोबत फ्राईड यांची विवाहविषयक व कामवासना विषयक विचारसरणी बुध्दिजीवीच्या परिचयाची होऊ लागली होती. पहिल्या महायुध्दानंतर सामाजिक अभिसरण वाढले आणि समाजघटनेतही स्थित्यंतरे होऊ लागली होती. जुनी पिढी नवी पिढी असेही एक द्वंद्व निर्माण झाले होते. पुरूषोत्तम यशवंत देशपांडे यांच्या बंधनाच्या पलीकडे या कादंबरीतील नव्याजुन्याचा झगडा या पाचव्या प्रकरणात तत्कालीन समाजाच्या संक्रमणावस्थेवरील भाष्य आहे. जुन्या नव्याचे तुफान माजू पाहत आहे. या शब्दात काळाचे भान देऊन कादंबरीकाराने नव्या पिढीचा स्वैर संचार आणि जुन्या पिढीच्या मनातील काळजी व्यक्त केली आहे. वेश्येबरोबर एखाद्या पुरूषाने राहणे हे समाजाला मान्य असते परंतु तिच्याशी विवाह केला की समाजात खळबळ माजते. हे बंधनाच्या पलीकडे कादंबरीत दाखवले आहे. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या ब्राम्हण कन्या या कादंबरीत विवाह नावाचा संस्कार न करता स्त्री पुरूषांनी पती पत्नी म्हणून राहणे इष्ट कसे आहे किंबहुना ते निंद्य नाही हे दाखवले आहे. गोंडवनातील प्रियवंदा या कादंबरीत त्यांनी म्हटले होते. एखाद्या जमीनीचा विशिष्ट बी पेरण्यासाठी उपयोग करावा की करू नये हे ज्याप्रमाणे जमीनीच्या मालकाने ठरवायचे असते बियांच्या व्यापा-याने नसते त्याप्रमाणे प्रजोत्पादनाचा प्रश्न केवळ स्त्रियांनी आपल्या इच्छेने सोडवावा. विवाह आणि प्रजोत्पादन याविषयी झालेले सर्व पुरूषी नियम व्यर्थ आहेत. वा.म. जोशी सुशीलेचा देव रागिणी, आश्रमहरिणी, नलिनी, इंदू काळे सरला भोळे या पाचही कादंब-यातून स्त्रीच्या जीवनात होत गेलेले बदल मनोविश्लेषणात्मक पध्दतीने दाखवलेले आहेत.

स्वभावरेखांच्या बाबतीत ही महत्वाचा फरक पडला आहे. पूर्वीची स्वभावचित्रे म्हणजे मोत्याच्या हारासारखी सुंदर वा समर्पक घटना प्रसंगाना व्यक्तीसंबंधाच्या मालिकेत एकत्र गोवणारा व्यक्तित्वाचा दौरा म्हणजे प्रभावी व्यक्तिचित्रण असे मानले जाई नव्या मानसप्रतितीमुळे व्यक्तिमत्वाची संकल्पनाच बाद झालेली आहे. व्यक्तिमत्व हे एकसंध दृष्टीने न पाहता त्याच्याकडे आता पृथक्करणात्मक दृष्टीने पाहिले जाते. व्यक्तिच्या कर्तृत्वाला त्याच्या कर्तृत्वकक्षाप्रमाणे अनेक पैलू असतात. त्याच्या पैलूंचे दर्शन कथाकार घडवतो.इतिहास प्रसिध्द स्वभावरेखन चित्रणात या पध्दतीला अवसर असल्याने ऐतिहासिक व्यक्तिचित्रे महत्वाची व लेखकप्रिय ठरली आहेत. त्यामुळे मानवी मन, मानवी जीवन आणि मनुष्याच्या विविध धडपडी यांची एक नवी अनुबंधनता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाङयाचे स्वरूप, धारणा, आकलन, रसग्रहण

याविषयी मुलभूत संकल्पनात बदल झालेला आहे. वाङमय हे यामुळे विविध विचार नैतिक तत्वे, विविध संघर्षाचे चित्रण, अविष्करण न ठरता माणसाच्या मनाची जी नवी प्रतिमा निर्माण झाली तिचा शोध घेण्याचे एक शब्दरूप साधन बनले. माणसाच्या मनातील विचार, भावना, कल्पना, वासना, वर्तन इत्यादींचे मूळ त्याच्या अंतर्मनात आहे या जाणिवेने अंर्तमनाचा शोध सुरू झाला तसा तो शोध नवमानसतत्वे यांनी सुरू केला होता. पण त्याचे स्वरूप व्यक्तिगत होते. साहित्याच्या माध्यमाच्या वैशिष्टयामुळे लेखकांनी आपल्या प्रतिभेमुळे त्याला सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. त्यामुळे वाङमयातील जीवनचित्रण, विचार, भावना इत्यादीच्या अविष्कांराची प्रतच बदलली.

अबोध मनाच्या शोधामुळे व्यक्तित्वाची जुनी संकल्पनाच गैरलागू ठरली. नव्या प्रतिमेमुळे मानवीमन हे एखाद्या नदीप्रवाहाप्रमाणे ठरले. हा प्रवाह हा कधी शांतपणे वाहतो. तर कधी महापुराप्रमाणे सुसाट त्याचे पाणी कधी शंखासारखे स्वच्छ तर कधी गढुळलेले अशा या जलप्रवाहाप्रमाणे मन असल्यामुळे क्षणाक्षणाला बदलते. असे हे नवे मन लेखकापुढे अविष्कारण, चित्रण पध्दतीवर परिणाम झाला. वर्णनाला वाङमयात स्थान राहिले नाही. त्याऐवजी चित्रात्मक, क्षणचित्रात्मक, दृश्यात्मक एकापुढे एक दाखवणे अशी पध्दती कथाप्रधान वाङमयात रूढ झाली. आधुनिक कथा साहित्यातील चित्रात्मक पध्दतीचे तात्विक अधिष्ठान हेच आहे.कथा, कादंबरी साहित्यप्रकारावरील प्रभाव पाहत असताना मर्ढेकरांच्या रात्रीचा दिवस गंगाधर गाडगीळ यांच्या कादंब-या ह. ना. आपटे यांची वज्राघात या कादंबरीत माणसाच्या अंर्तमनात वावरणा-याईच्छांची आणि प्रेरणांची अशी एक अर्थपूर्ण आकृती त्यांना लाभली. या कादंबरीला लाभलेल्या एक परिणामाचा शोध लागतो. वसंत कानेटकरांनी लिहिलेल्या घर पंख आणि पोरका ही कादंबरी मात्र मानसशास्त्रीय पध्दतीची ग्वाही देणारी ठरेल. चि. त्र्यं. खानोजकर यांच्या रात्र काळी घागर काळी अजगर या कादंब-याही मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून लिहिल्या आहेत. विश्राम बेडेकरांची रणांगण कादंबरी याव प्रभावातून लिहिली आहे.बाबू बिरादार यांच्या कावड या कादंबरीतून मानवी वासनांचे चित्रण दिसून येते.गंगाधर गाडगीळ यांच्या कथा मनोविश्लेषणात्मक दिसून येतात. विद्याधर पुंडलिक, शंकर पाटील, दि. बा.मोकाशी, बाबूराव बागूल यांची मैदानातील माणसे या कथेत मानसशस्त्राचे परिणाम जाणवतात. गाडगीळांच्या उंट आणि लंबक या कथेत एका सुशिल गृहिणीच्या मनात हलकेच डोकावणारी कामभावना आणि मुक्त जीवनाची भूक तिला कशी उध्वस्त करते याचे चित्रण या कथेत दिसून येते. जी.ए. कुलकर्णी यांच्या नाग, जास्वंद या कथांचाही या दृष्टिकोणातून विचार करता येतो. प्रा. वसंत कानेटकरांच्या घर, बेडेकरांची रणांगण, मर्ढेकरांच्या रात्रीचा दिवस, तांबडी माती आणि पाणी या कादंब-यातून संत्राप्रवाही चित्रणाचे प्रयोग केले गेले.विश्राम बेडेकरांनी रणांगण (1936) ही चर्चाविषय झालेली एकुलतीएक कादंबरी लिहून आपल्या नवनिर्माण शक्तीची प्रथगात्मता प्रस्थापित केलेली आहे. चक्रधर व जर्मन ज्यू तरूणी हॅर्टा यांचे युरोप ते हिंदुस्थानच्या बोटीवरील प्रवासात जडलेले प्रेम आणि नंतर हॅर्टाच्या आत्महत्येची बातमी एवढेच काय ते या कादंबरीचे कथानक आहे. पण संज्ञाप्रवाह पध्दतीने लिहिलेल्या या कादंबरीत कथानकाचे महत्व अगदीच गौण आहे. या कादंबरीच्या निमित्ताने वसंत तांबे यांनी लिहिलेल्या संज्ञाप्रवाहपध्दती (सहयाद्री जानेवारी 1941) या लेखात म्हटल्याप्रमाणे नायकाचे व यांच्या सभोवतालच्या पात्रांचे विविध अनुभव हा कादंबरीचा विषय आहे. लेखकाला जे जे अनुभव आले ते ते त्याने सगळे मनावर जसे नोंदले गेले तसे दिले आहेत.बेडेकरानंतर कादंबरीलेखनाकरीता संज्ञाप्रवाहपध्दतीचा जाणीवपूर्वक व अभ्यासपूरक उपयोग करण्याचे श्रेय मर्ढेकरांना जाते. एका विशिष्ट व्यक्तीच्या कांही तासांच्या संज्ञाप्रवाहांचे चित्रण करण्याकरिता रात्रीचा दिवस ही पहिली कादंबरी पूर्णतः संज्ञाप्रवाहपध्दतीचा एक प्रयोग म्हणून रचण्यात आलेली आहे. रात्रीचा दिवस मध्ये विकृतीचा प्रयत्न गालावर तीट असावी इतक्या प्रमाणात आपण केला असल्याची त्यांनी कबूली दिली आहे.

**निष्कर्ष :-**

1) मराठी साहित्यावर प्रथम सिग्मंड फ्राईडच्या विचारसरणीचा प्रभाव नवसाहित्यावर पडला. नवकथा, कादंबरी, नवनाटय, नवकाव्य इत्यादी प्रकारांवर फ्राईड यांच्या मनोविश्लेषणशास्त्र, संज्ञाप्रवाह, दिवास्वप्न या विचारांचा प्रभाव पडलेला आहे.
2) कथा, कादंबरी आदिबंधात मानसशास्त्राचा व्यापक परिणाम अंतर्गत व बाह्य अशा दोन प्रकारचा आहे.

3) नव्या मनोविज्ञानाप्रमाणे मुख्य प्रश्न पात्रांच्या अंर्तमनात डोकावला जाणीवयुक्त मनाचा शोध अनेकांनी घेतला. मर्ढेकर व गाडगीळ यांच्या नवनिर्मितीला पाश्चात्य साहित्य संस्कृतीचे संस्कार प्रेरक ठरले.
4) प्रकटमन-बोधमन, अप्रकटमन-अबोधमन म्हणजे मनोविश्लेषणाचा प्रभाव माडगुळकर, गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे यांच्या कथांतील पात्रावर मनोविश्लेषणशास्त्राचा प्रभाव पडलेला आहे.
5) या नव्या मनोविज्ञानामुळे कथानक, भाषा, घाट अशा सर्वच बाबी प्रभावित झाल्या. रूढ संकेत अपुरे पडू लागले. त्यामुळे साहित्यकृतीच्या घाटाचा नव्याने विचार होऊ लागला.

**संदर्भग्रंथ**

1) म.न. उदगांवकर, अक्षयकुमार साळुंखे, इंग्रजी साहित्याची रूपरेषा, प्रमोद प्रकाशन, मिरज, प्रथमावृत्ती, 1979
2) हरिश्चंद्र थोरात, कथनात्म साहित्य आणि समीक्षा, शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 2011
3) रा.श्री. जोग, श्री. ना. बनहट्टी, प्रदक्षिणा, (खंड पहिला) कॉनिअनेंटल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण 1993
4) डॉ. आनंद पाटील, तौलनिक साहित्य : नवे सिध्दांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1998
5) डॉ. भालचंद्र नेमाडे, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, द्वितीयावृत्ती 2001
6) डॉ. अनिल उगले, मराठी संज्ञाप्रवाही कादंबरी एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, 2010